**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२१३/२०२१ मधील निशाणी क्र.१२ वरील आदेश</u>**
(रमेश सिताराम मुरकुटे **विरुध्द** अंबादास सुखदेव मुरकुटे व इतर)
(संगणकीकृत नोंदणी क्र.एम.एच.ए.एच.०५-०००६९८-२०२१)

प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदरचा अर्ज कैफियत देण्यास झालेला उशीर माफ होउन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२) प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी असे कथन केले की, डिसेंबर २०२१ चे दरम्यान प्रतिवादी क्र.१ व ४ हे वृध्दापकाळाने आजारी असल्यामुळे व प्रतिवादी क्र.२ यांचे बायपासचे ऑपरेशन झालेले असल्यामुळे ते न्यायालयात हजर राहु शकले नाही. तसेच प्रतिवादी क्र.३ हे काही महत्वाचे कामानिमित्त बाहेरगांवी असल्यामुळे तसेच प्रतिवादी क्र.३ हेच सदर केसबाबतचे कामकाज बघत असल्याने त्यांचा वकीलांशी संपर्क होवु शकला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना न्यायालयात हजर होवुन म्हणणे देता आले नाही. सबब वादीचे दाव्यावर कैफियत देणेकामी झालेला उशीर माफ करण्यात यावा अशी विनंती केली.

३) सदर अर्जावर वादी यांचे म्हणणे मागविले. वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज खरा नाही. प्रतिवादीने दिलेली कारणे खरी नाही. त्या संदर्भाने कोणताही कागदोपत्री पुरावा दाव्यात दाखल केलेला नाही. प्रतिवादींनी जाणुन बुजून कैफियत दाखल करण्यास उशीर केलेला आहे. म्हणुन सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

४) अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना समन्स बजावणी होऊन विहित मुदतीत म्हणजेच ९० दिवसांचे आत कैफियत दाखल करणे गरजेचे होते. परंतु प्रतिवादी क्र.१ व ४ हे वृध्दापकाळाने आजारी असल्याने, प्रतिवादी क्र.२ चे बायपासचे ऑपरेशन झाल्यामुळे तसेच प्रतिवादी क्र.३ हे महत्वाच्या कामानिमित्त बाहेरगांवी असल्यामुळे मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाही. प्रतिवादी

क्र.१ ते ४ यांची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणुन सदर दावा हा गुणवत्तेवर निर्णीत होणेकरीता प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करणे न्यायोचित ठरेल. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादी यांना रक्कम रु.३००/– कॉस्ट द्यावी. कॉस्टची पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची कैफियत रेकॉर्डवर घेण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUREKHA VIJAY MORE
Date: 2022.06.17 16:52:53 +0530

ठिकाण : श्रीरामपूर.
दिनांक : १७/०६/२०२२.

**(श्रीमती एस. व्ही. मोरे)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
श्रीरामपूर.